# गव्हावरील किडींचे व्यवस्थापन

**डॉ. भैय्यासाहेब गायकवाड**
विषय विशेषज्ञ (किटकशास्त्रज्ञ)

**डॉ. हनुमान गरुड**
विषय विशेषज्ञ (कृषिविद्या)

**प्रा. किशोर जगताप**
प्र. कार्यक्रम समन्वयक

कृषि विज्ञान केंद्र, खामगाव, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

रब्बी हंगामामध्ये मराठवाड्यात रब्बी ज्वारी, गहू, हरभरा, करडई इत्यादी पिके घेतली जातात. पिकाच्या उत्पादणात घट येण्याच्या कारणापैकी किडींचा प्रादुर्भाव हे एक महत्वाचे कारण आहे. त्यामुळे वेळीच या किडींचे व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. आपल्या भागातील गव्हावरील महत्वाच्या किडींची माहिती व त्यांचे व्यवस्थापन या लेखामध्ये दिली आहे.

**खोडमाशी:**

प्रादुर्भाव फक्त रोप अवस्थेत दिसून येतो. उशिरा पेरणी झालेल्या ठिकाणी प्रादुर्भाव जास्त प्रमाणत आढळतो. ढगाळ वातावरणात या किडीची वाढ झपाट्याने होते. हि किड प्रामुख्याने ज्वारी, बाजरी, मका व गहू या पिकावर उपजिविका करते. अळी रोपाच्या बुडापर्यंत जावून खोडाला छिद्र पाडते आणि आत शिरून वाढणाऱ्या पोंग्यावर उपजीविका करते. त्यामुळे सुरवातीला मधला भाग पिवळसर पडून नंतर तो मरून जातो यालाच पोंगेमर असे म्हणतात. लहान रोप या किडीच्या प्रादुर्भावामुळे पूर्णतमारून जातात तर मोठ्या रोपांना बाजूने फुटवे फुटून उत्पादनात घट दिसून येते.

**खोडकिडा:**

या किडीचा पतंग तपकिरी किंवा गवती रंगाचा व अळी गुलाबी रंगाची असते. ती अंगाने मऊ असून डोके काळे असते. या किडींच्या प्रादुर्भावामुळे वाढणारा मधला भाग सुकून जातो. अळी खोडात शिरून खलील भागावर उपजीविका करते. त्यामुळे रोपे सुकून जातात व त्यांना ओंब्या येत नाहीत. पीक फुलोऱ्यात असताना जर प्रादुर्भाव झाला तर ओंब्यामध्ये दाणे भरत नाहीत व त्या पोचट पांढऱ्या राहतात.

**नियंत्रण:** जमिनीची खोल नांगरट दोन ते तीन कुळवनी करून कडी, कचरा, धसकटे वेचून शेत साफ ठेवावे. जमिनीच्या उताराला आडव्या सरी पाडून पेरणीसाठी तयारी करावी. खोडकिडीच्या व्यवस्थापणासाठी उभ्या पिकातील किडग्रस्त झाडे आठवड्याच्या अंतराने दोन ते तीन वेळा मुळासकट उपटून नष्ट करावेत. तसेच पिकाची कापणी झाल्यावर उपद्रवग्रस्त शेतातील धसकटे गोळा करून जाळावीत. सायपरमेथ्रिन १० ई. सी. ११ मी. ली. या रासायनिक किटकनाशकाचा प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

**तुडतुडे आणि मावा:** तुडतुडे हे हिरवट राखडी रंगाचे असून पाचरीच्या आकाराचे असतात. तुडतुडे आणि त्याची पिल्ले पांनातून रस शोषण करतात. त्यामुळे पाने पिवळे पडून वाळू लागतात व पिकाची वाढ खुंटते.

गव्हावर दोन प्रकारचा मावा आढळून येतो. एकाचा रंग पिवळसर तर दुसऱ्याचा रंग निळसर हिरवा असतो. मावा किडीची पिल्ले व प्रौढ पांनातून व कोवळ्या शेंड्यातून रस शोषण करतात. तसेच आपल्या शरीरातून मधासारखा गोड व चिकट पदार्थ सोडतात त्यामुळे काळी बुरशी वाढते.

**नियंत्रण:** तुडतुडे आणि मावा किडींच्या व्यवस्थापणासाठी डायमिथोएट ३० टक्के प्रवाही ३० मी. ली. किंवा थायमिथोक्झाम २५ डब्लु. जी. १ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

**वाळवी किंवा उधई:** या किडीचा प्रादुर्भाव पीक वाढीच्या अवस्थेत दिसून येतो. वाळवी किड गव्हाच्या रोपाची मुळे खातात व त्यामुळे रोपे वाळतात आणि संपूर्ण झाड मरते.

**नियंत्रण:** वाळवीचा बंदोबस्त करण्यासाठी बांधावर असलेली वारुळे खणून काढावेत व त्यातील राणीचा नाश करावा. वारुळे नष्ट करून जमीन सपाट केल्यावर मध्यभागी सुमारे ३० सेमी खोलवर एक छिद्र करावे व त्यात क्लोरपायरिफॉस २० टक्के प्रवाही १५ मिली १० लिटर पाण्यात मिसळून वारुळात ओतावे किंवा फोरेट १० टक्के दाणेदार जमिनीत टाकावे किंवा शेणखता बरोबर द्यावे.

**उंदीर:** शेतामधील पिकाचे उंदीर अतोनात नुकसान करतात ते गव्हाच्या ओंब्या फस्त करतात तसेच बिळामध्ये नेवून ते साठवितात. शिवाय शेतातील बांधावर, पाण्याच्या पाटात व इतर ठिकाणी शेतात उंदरांनी बिळे केल्यामुळे पिकांना मिळणारे पाणी बिळात झिरपून अनाठायी खर्च होतो. बांधाची व पाटाची नेहमी दुरूस्ती करावी लागते.

**नियंत्रण:** उंदराची बिळे नष्ट करावीत. उंदराचा सापळ्याद्वारे बंदोबस्त करावा किंवा झिंक फॉस्फाईड या विषारी आमिषाचा वापर करावा. आमिष तयार करण्यासाठी झिंक फॉस्फाईड एक भाग आणि कोणत्याही धान्याचा भरडा ४९ भाग या मिश्रणामध्ये योग्य प्रमानात खाद्यतेल आणि पाणी टाकावे. त्याचे मध्यम आकाराचे गोळे तयार करून उंदराच्या बिळामद्धे आतवर टाकावेत. त्यानंतर ही छिद्रे बंद करून टाकावीत. अशा प्रकारे तयार केलेले एक किलो आमिष हे २०० जिवंत बिळासाठी पुरेसे ठरते.

(संपर्क: +९१ ९४२०४५९८०८)

★ ★ ★